Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड दर्पण

वरुड | बुधवार
२४.०६.२०२६

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १४४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

# लवकरच केंद्रीय मंत्रीमंडळात बदल होण्याची शक्यता : भाजपाची मोठी रणनिती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – दिल्लीतील राजकारणात लवकरच काही घडामोडी घडण्याची शक्यता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळ आणि भाजप संघटनेत मोठ्या फेरबदलाची चर्चा सुरु आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदींनी मंगळवारी (२३ जून, २०२६) राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. २०२७ च्या सुरुवातीला उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, गोवा आणि मणिपूर या पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. परिणामी, या राज्यांमध्ये आपले स्थान मजबूत करण्याच्या रणनीतीचा भाग म्हणून भाजप संभाव्य फेरबदलाचा विचार करत असल्याचे मानले जात आहे.

## दिल्लीतील राजकारणात लवकरच मोठया घडामोडीची शक्यता



केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन यांचा राज्यसभेतील कार्यकाळ संपल्यानंतर आणि भाजपने त्यांना राज्यसभेत पुन्हा न निवडण्याचा निर्णय घेतल्यामुळे, केरळच्या प्रतिनिधित्वाबाबत नवीन चर्चा सुरू झाली आहे. आता प्रश्न असा आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळात केरळला नवीन प्रतिनिधी मिळेल का. सध्या, केंद्र सरकारमध्ये केरळमधून भाजपचे एकमेव मंत्री अभिनेते-राजकारणी सुरेश गोपी आहेत, ज्यांनी थ्रिसूर लोकसभा मतदारसंघातून ऐतिहासिक विजय मिळवला आहे.

**बिट्टू पंजाबच्या राजकारणात परतणार**

उद्या केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक होणार असून, त्यानंतर मंत्रिपदांमध्ये बदल किंवा नवीन चेहऱ्यांचा समावेश जाहीर केला जाऊ शकतो. भाजपने दोन केंद्रीय मंत्री, जॉर्ज कुरियन आणि रवनीत सिंग बिट्टू यांना राज्यसभेसाठी पुन्हा उमेदवारी दिली नाही. बिट्टू यांनी अद्याप औपचारिकपणे राजीनामा दिलेला नाही. तथापि, त्यांनी हे स्पष्ट केले आहे की ते पंजाबच्या राजकारणात परतत असून पुढील वर्षी होणारी विधानसभा निवडणूक लढवतील.

मंत्रिमंडळाच्या माध्यमातून उत्तर प्रदेशला आपल्या बाजूने वळवण्यावर भर

याशिवाय, भाजपच्या 'एक व्यक्ती, एक पद' धोरणांतर्गत आणखी दोन मंत्र्यांना हटवले जाऊ शकते. यामध्ये दिल्ली भाजपचे अध्यक्ष झालेले हर्ष मल्होत्रा ??आणि उत्तर प्रदेश भाजपचे अध्यक्ष झालेले पंकज चौधरी यांचा समावेश आहे. पुढील वर्षीच्या सुरुवातीला उत्तर प्रदेशमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत, त्यामुळे भाजपच्या 'एक व्यक्ती, एक पद' या तत्त्वानुसार त्यांना आपल्या केंद्रीय मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागू शकतो. उत्तर प्रदेशमध्ये सर्वाधिक ८० लोकसभा जागा आहेत आणि गेल्या विधानसभा निवडणुकीत अखिलेश यादव यांनी भाजपला मोठा धक्का दिला होता.

मोदी सरकार पंकज चौधरी यांच्या जागी मंत्रिमंडळात पूर्वांचलमधील एखाद्या प्रमुख ओबीसी किंवा दलित नेत्याला स्थान देऊ शकते. समाजवादी पक्ष (एसपी) आणि काँग्रेसच्या पीडीए (मागास, दलित, अल्पसंख्याक) सूत्राला प्रत्युत्तर देण्यासाठी, भाजप या फेरबदलात उत्तर प्रदेशातील नव्या चेहऱ्यांना स्थान देऊन सामाजिक संतुलन राखण्याचा प्रयत्न करेल.

**पंजाब निवडणुकीवर नजर**

पुढील वर्षी पंजाबमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. रवनीत बिट्टू यांना पदावरून हटवल्यामुळे पंजाबमधील एक मंत्रिपद रिक्त होणार आहे. भाजपने केवल सिंग ढिल्लन यांची पंजाब अध्यक्षपदी नियुक्ती केली असून, त्यामुळे एक शीख चेहरा मागे पडला आहे. त्यामुळे, मंत्रिमंडळात एका हिंदू चेहऱ्याचा समावेश करून समतोल साधण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो.

# ऑनलाईन गेमिंग फसवणूक प्रकरणी १२ आरोपी अटकेत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***अमरावती*** – जिल्ह्यातील गरीब व मजूर वर्गातील नागरिकांना सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखवत त्यांची बँक खाती उघडून घेणे, पासबुक, एटीएम कार्ड, लिंक मोबाईल क्रमांक व सिमकार्ड ताब्यात घेऊन त्या खात्यांचा ऑनलाइन आर्थिक गुन्ह्यांसाठी वापर करणाऱ्या टोळीचा अमरावती ग्रामीण पोलिसांनी पर्दाफाश केला आहे.

या प्रकरणी पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीनंतर शिरखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलिस निरीक्षक व सायबर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे विशेष पोलिस पथक तयार करून आरोपींचा शोध घेण्यात आला.

**गुन्ह्याची पद्धत**

आरोपी गरीब व मजूर

## अमरावती ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई




वर्गातील व्यक्तींना किरकोळ रक्कम देऊन त्यांच्या नावाने बँक खाती उघडत होते. त्यानंतर संबंधित व्यक्तींकडून पासबुक, एटीएम कार्ड, सिमकार्ड व मोबाईल क्रमांक ताब्यात घेऊन ती खाती ऑनलाइन गेमिंग आणि इतर आर्थिक व्यवहारांसाठी वापरली जात होती. या खात्यांमधून कोट्यवधी रुपयांचे व्यवहार झाल्याची माहिती तपासात समोर आली आहे.

**गोव्यातून आरोपी ताब्यात**

तांत्रिक तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी दक्षिण गोव्यातील अरोसा सागरवाडी परिसरात छापा टाकून अनेक संशयितांना ताब्यात घेतले. रेड दरम्यान पोलिसांनी महत्त्वाचे मुद्देमालही जप्त केला.

**१२ आरोपी अटकेत**

या प्रकरणात एकूण १२ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यामध्ये अमरावती, मुंबई, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश येथील आरोपींचा समावेश आहे. पोलिसांनी जप्त केलेल्या डिजिटल पुराव्यांचे परीक्षण सुरू असून या रॅकेटचे देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांशी संबंध आहेत का? याचाही तपास सुरू आहे.

ऑनलाइन आर्थिक फसवणुकीविरोधातील ही कारवाई अमरावती ग्रामीण पोलिसांसाठी मोठे यश मानले जात आहे.

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१५५७३० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने -१४२७५० रु.(१०ग्रॅम)

चांदी - २,७९,९०० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६०० - | २१०० |
| गहू - | २२०० - | २४०० |
| तूर - | ७५०० - | ८००० |
| मूग - | ६७०० - | ७२०० |
| उडीद - | ६७५० - | ७५०० |
| हरभरा - | ५४०० - | ५७०० |
| सोयाबिन - | ६५०० - | ६९५५ |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | १०८०० - | ११५०० |
| कापूस - | ८८०० - | ९१०० |
| मका - | १७०० - | १८०० |

# विधानसभेचे अध्यक्ष म्हणजे हेडमास्तर! पण हेडमास्तरांनाच पुन्हा शाळेत घालण्याची वेळ

## प्रदेशाध्यक्षा रोहीणी खडसे यांचा टोला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – विधानसभेचे अध्यक्ष म्हणजे हेडमास्तर, पण हेडमास्तरांनाच पुन्हा शाळेत घालण्याची वेळ आली आहे असा टोला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना लगावला आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले यांचा शोक प्रस्ताव विधानसभेत मांडण्यात आला.

## विधानसभेत पहिल्या दिवशी शोक प्रस्तावावर अडखळले



हा शोक प्रस्ताव वाचताना अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडून अनेक चुका झाल्या. यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्यावर खरमरीत पत्र लिहित टीका केली. त्यानंतर मोठा वाद उभा झाला आहे. आता या वादात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी देखील उडी घेतली आहे.

**रोहिणी खडसेंनी नार्वेकरांचा व्हिडिओ केला पोस्ट**

रोहिणी खडसे यांनी आपल्या सोशल मीडिया हँडलवरून नार्वेकर यांचा व्हिडिओ पोस्ट केला आहे. त्यावर त्या म्हणाल्या आहेत की, मनसे पक्षप्रमुख श्री. राज ठाकरे यांची फेसबुक पोस्ट वाचली आणि विधानसभेचे अध्यक्ष राहुलजी नार्वेकर यांचे कालचे आशा दिदींच्या शोक प्रस्तावाचे भाषण ऐकले. 'आपुल्याच घरात हाल सोसते मराठी' असं का म्हटलं जातं यांचं जळजळीत वास्तवच अक्षरशः समोर आलं. विधानसभेचे अध्यक्ष म्हणजे हेडमास्तर, पण श्री. नार्वेकरांचे भाषण ऐकून हेडमास्तरांना पुन्हा शाळेत घालण्याची वेळ आलीये असं म्हटलं तर ते चुकीचे ठरणार नाही असा टोलाही त्यांनी लगावला आहे.




# प्रियकराच्या मदतीने भावी पतीचा ढकलुन खून

## २,००४ कॉल्सने उघडले गुपित : केतन अग्रवाल मृत्यू प्रकरण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***पुणे*** – पुण्याजवळील ऐतिहासिक लोहगड किल्ल्यावर २५ वर्षीय व्यावसायिक केतन अग्रवाल याचा दरीत पडून झालेला मृत्यू हा अपघात नसून एक अतिशय थंड डोक्याने रचलेला खुनाचा कट होता, असा धक्कादायक खुलासा पुणे ग्रामीण पोलिसांनी केला आहे.

सुरुवातीला केतनचा पाय घसरल्याची माहिती देणाऱ्या त्याच्या २० वर्षीय होणाऱ्या पत्नीनेच (सिया गोयल) आपल्या प्रियकराच्या (चेतन चौधरी) मदतीने केतनला दरीत ढकलल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे.

या धक्कादायक प्रकरणाचा तपास करताना लोणावळा ग्रामीण पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे. केतन हा एक अनुभवी ट्रेकर होता, त्यामुळे त्याचा असा अचानक अपघात कसा होऊ शकतो, या संशयावरून पोलिसांनी तपास सुरू केला आणि या संपूर्ण प्रकरणामागील भयानक सत्य समोर आले.

**पहिला प्रयत्न फसला, सापाचा बहाणा अनब दुसऱ्यांदा यशस्वी मर्डर प्लॅन**

पोलीस चौकशी आणि केतनच्या कुटुंबीयांनी



केलेल्या आरोपांनुसार, केतनला मारण्याचा हा दुसरा प्रयत्न होता.

**१४ जूनचा पहिला अयशस्वी प्रयत्न**

केतन आणि सिया १४ जून रोजी लोहगडला गेले होते. तिथे सियाने केतनला कड्यावरून ढकलले होते, परंतु सुदैवाने एका झाडामुळे त्याचा जीव वाचला. तेव्हा सियाने तिथून साप जात होता आणि केतनला वाचवण्यासाठी त्याला ढकलले, अशी खोटी कथा रचली होती.

वाढदिवसाचे निमित्त करून पुन्हा बोलावले: केतन या अपघातानंतर पुन्हा तिथे जाण्यास तयार नव्हता. मात्र, सियाने तिचा वाढदिवस साजरा करण्याचे कारण सांगत केतनच्या आईला फोन करून त्याला तयार करण्यास सांगितले. केतनने तिच्या २० जूनच्या वाढदिवसासाठी जयपूरमध्ये मोठे नियोजन केले होते, पण १८ जून रोजीच त्याला पुन्हा लोहगडला नेण्यात आले.

**प्रियकराची एंट्री आणि थेट मृत्यू**

१८ जून रोजी सियासोबत तिचा प्रियकर चेतन चौधरी देखील तिथे पोहोचला. या दोघांनी मिळून केतनला कड्यावरून थेट दरीत ढकलून दिले, ज्यात त्याचा जागीच मृत्यू झाला.

मोबाईलच्या २,००४ कॉल्स आणि तांत्रिक पुराव्यांनी उडाली झोप

केतनच्या अंत्यसंस्कारानंतर ४ दिवसांनी जेव्हा सिया त्याच्या घरी गेली, तेव्हा केतनच्या बहिणीने विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना तिची जीभ घसरली. तिथून कुटुंबाचा संशय बळावला. यानंतर पोलिसांनी तांत्रिक तपास केला असता धक्कादायक डिजिटल पुरावे हाती आले. सिया आणि चेतन यांच्यात जानेवारी ते जून दरम्यान तब्बल २,००४ वेळा फोनवर संभाषण झाले होते, ज्याचा एकूण कालावधी २३८ तास इतका होता.

लोकेशन लपवण्याचा अयशस्वी प्रयत्न: १८ जून रोजी आरोपी चेतनने सकाळी ७ ते संध्याकाळी ५:४० वाजेपर्यंत आपला इंटरनेट डेटा बंद ठेवला होता. पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी तो स्वतःचा फोन दुकानात ठेवून कर्मचाऱ्याच्या फोनसह लोहगडला गेला होता, मात्र पोलिसांनी तिथल्या इतर पुराव्यांवरून त्याचे लोकेशन शोधून काढले.

शासकीय कामकाजातील पत्रव्यवहार, टिपण्या, अहवाल तयार करणे, शासकीय कामांचे भाषांतर, दस्तऐवजांचे सारांश तसेच ज्ञानभांडारातील माहिती शोधणे अधिक वेगाने आणि अचूकपणे करता येणार

# महाराष्ट्राचा 'महा एआय' उपक्रम देशात ठरणार अभिनव : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी 'महाराष्ट्र हब' हा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित देशातील पहिलाच अभिनव उपक्रम विकसित करण्यात आला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. लवकरच या उपक्रमाची अंमलबजावणी राज्यातील विविध विभागात होणार असून या माध्यमातून शासकीय कामकाजातील पत्रव्यवहार, टिपण्या, अहवाल तयार करणे, शासकीय कामांचे भाषांतर, दस्तऐवजांचे सारांश तसेच



शासकीय ज्ञानभांडारातील माहिती शोधणे यांसारखी कामे अधिक वेगाने आणि अचूकपणे करता येणार असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानभवन येथे महा एआय प्लॅटफॉर्मबाबत बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता,वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, प्रधान सचिव नवीन सोना, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, महाआयटीच्या संचालक भुवनेश्वरी एस,राज्य सूचना माहिती अधिकारी व उपमहासंचालक सपना कपूर यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील शासकीय यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत प्रशासन अधिक परिणामकारक करण्यासाठी 'महा एआय' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राने महाराष्ट्रासाठी ही प्रणाली विकसित केली असून ती इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य डेटा सेंटरच्या पायाभूत सुविधांवर कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे शासकीय माहितीचे सार्वभौमत्व, गोपनीयता व सुरक्षितता सुनिश्चित होणार आहे.

सर्व संवेदनशील शासकीय माहिती शासनाच्या स्वतःच्या नियंत्रणाखाली राहणार असून, माहितीची साठवणूक व प्रक्रिया राज्य शासनाच्या सुरक्षित अधोसंरचनेमध्येच केली जाणार आहे. 'महा एआय'' प्रणालीद्वारे अधिकृत पत्रे, ई-मेल, टिपण्या तयार करणे, दस्तऐवजांचे संक्षिप्तीकरण, स्पष्टीकरण व भाषांतर, शासकीय नियम, अधिनियम, शासन निर्णय आणि परिपत्रकांवरील संदर्भाधारित माहिती शोधणे तसेच नैसर्गिक भाषेत अहवाल तयार करणे शक्य होणार आहे. लाभार्थ्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने लाभार्थी पडताळणीची सुविधाही उपलब्ध होणार आहे. सदर प्रणालीमध्ये विविध एआय मॉडेल्सची निवड, प्रतिमा व दस्तऐवज अपलोडची सुविधा उपलब्ध आहे. या प्रणालीमध्ये वापरकर्तानिहाय सुरक्षित लॉगिंग, एंड-टू-एंड एन्क्रिप्शन, पदानुसार प्रवेश नियंत्रण यांसारखी सुरक्षा वैशिष्ट्ये समाविष्ट करण्यात आली आहेत, त्यामुळे शासकीय दस्तऐवज आणि माहितीची गोपनीयता अबाधित राहणार आहे.

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह व राज्य सूचना माहिती अधिकारी व उपमहासंचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र सपना कपूर यांनी महा एआय प्लॅटफॉर्मबाबत सादरीकरण केले.

# ३० जून पर्यंत वार्षिक विवरणपत्र दाखल करावे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ अंतर्गत नोंदणीकृत प्रत्येक नियतकालिकाने आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित वार्षिक विवरणपत्र प्रेस सेवा पोर्टल वर ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ चे विवरणपत्र सादर न करणाऱ्या प्रकाशकांना ३० जून २०२६ पर्यंतची अखेरची संधी देण्यात आली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे भारत सरकारच्या प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांद्वारे कळिवले आहे. प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ मधील कलम १४(१)(ब) व १४(३) नुसार, वार्षिक विवरणपत्र निर्धारित मुदतीत न भरल्यास संबंधित प्रकाशकावर दंड आकारण्याची तरतूद आहे. पहिल्या चुकीसाठी किमान दहा हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. त्यानंतरच्या प्रत्येक चुकीसाठी दंडाची रक्कम मागील दंडाच्या दुप्पट असेल. मात्र, एकूण दंडाची कमाल मर्यादा दोन लाख रुपये निश्चित करण्यात आली असल्याचे प्रेस रजिस्टार जनरल, नवी दिल्ली यांनी दिलेल्या सूचनांमध्ये नमूद केले आहे.

# आ.संजय खोडके यांनी पावसाळी अधिवेशनात तालिका सभापती म्हणून सांभाळले कामकाज

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधान परिषदेतील कामकाजा दरम्यान पीठासीन सभापती राम शिंदे यांच्या अनुपस्थितीत तालिका सभापती म्हणून आ.संजय खोडके यांनी सभागृह चालविले. यावेळी सत्ताधारी पक्षाच्या वतीने आणलेल्या महाराष्ट्र विधान परिषद नियम २६० च्या



प्रस्तावावर चर्चा सुरु असतांना पीठासीन तालिका सभापती संजय खोडके यांनी आपल्या संसदीय कामकाजाचा परिचय देऊन तब्बल दोन तास चांगल्या तर्हेने विधान परिषदेतील कामकाज चालविले. महाराष्ट्र विधान परिषदेत सत्ताधारी पक्षाने नियम २६० नुसार महत्त्वाच्या सार्वजनिक मुद्द्यांवर चर्चेचा प्रस्ताव मांडण्यात आला. यावेळी सभागृहातील सदस्यांनी शेतकरी विकासाबरोबरच दुष्काळजन्य परिस्थिती, कर्जमाफी, विविध कृषी योजना , जलसंधारण अशा विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. हि चर्चा अत्यंत महत्वपूर्ण असतांना तालिका सभाध्यक्ष म्हणून विराजमान आ. संजय खोडके यांनी तब्बल दोन तास चांगल्या तर्हेने सभागृह चालविले. त्यांनी नियोजित वेळेत प्रत्येक सदस्यांना बोलण्याची संधी दिली. तसेच सत्ताधारी सदस्यांबरोबरच विरोधी बाकावर बसलेल्या आमदारांचे सुद्धा म्हणणे ऐकून घेतले. सभागृहाचे कामकाज चालवीत असतांना तालिका सभाध्यक्ष आ. संजय खोडके यांनी आपल्या संसदीय कामकाजाचा परिचय देऊन अनुभव , शिस्त , संयम व सद्विवेक बुद्धीचा देखील प्रत्यय घडवून दिला. आ,संजय खोडके यांना विधान परिषदेमध्ये पीठासीन तालिका सभापती म्हणून पाहतांना अमरावतीकरांचे हृदय अभिमानाने भारावले.

# वणव्यांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि विविध कार्यपद्धतीचा अभ्यास करणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – जंगलात लागणारे वणवे आटोक्यात आणण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि विविध देशांतील कार्यपद्धतीचा अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. यासाठी ऑस्ट्रेलियामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे करण्यात येत असलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करण्यासाठी राज्यातील वनविभागाच्या चार अधिकाऱ्यांचे पथक पाठवण्याचा मानस



असल्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

सदस्य भास्कर जाधव यांनी याविषयी मांडलेल्या लक्षवेधी चर्चेत सदस्य शेखर निकम, दिलीप

## वनमंत्री गणेश नाईक यांचे उत्तर

लांडे, सुनील प्रभू यांनी सहभाग घेतला, त्यास उत्तर देताना मंत्री नाईक बोलत होते. वनमंत्री नाईक म्हणाले की, राज्यातील जंगलांमध्ये वणवा लागू नये यासाठी; तसेच राज्यातील वनसंपदा आणि जैवविविधतेचे संरक्षण, संवर्धन करण्यासाठी वनविभाग सातत्याने कार्यरत आहे. वन विभागाच्या या कामात जनसामान्यांचा सहभाग महत्वाचा असून यासाठीच्या जनजागृतीमध्ये सर्वच पदाधिकाऱ्यांनी सहभाग घ्यावा. वनमंत्री नाईक म्हणाले की, राज्यातील खासगी मालकी असणाऱ्या जागेत लागणारा वणवा, यामुळे होणारे नुकसान, त्याबाबतची भरपाई या संदर्भात संबंधित विभाग व मंत्र्यांसमवेत बैठक घेतली जाईल.

# 'अमृत मानस मित्र' मोफत प्रशिक्षण कार्यक्रमासाठी अर्ज करण्याचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, भावनिक सक्षमीकरण आणि समुपदेशन सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था अमृतच्या वतीने अमृत मानसमित्र समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येत आहे. या अभिनव उपक्रमासाठी महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे ही तांत्रिक व शैक्षणिक भागीदार म्हणून कार्यरत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण नुसार शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या समुपदेशनाची तरतूद असून, कौशल्याधारित शिक्षणावर भर देण्यासाठी हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पहिल्या बॅचसाठी पात्र उमेदवारांना २९ जून २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. अशी माहिती अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली आहे.

या कार्यक्रमांतर्गत निवड झालेल्या अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांना पुणे येथे १५ दिवसांचे मोफत ऑफलाईन प्रशिक्षण दिले जाईल. या अभ्यासक्रमात मानसिक आरोग्य, संवाद कौशल्ये, संकट व्यवस्थापन आणि मानस सामाजिक सहाय्य यांसारख्या विषयांवर प्रत्यक्ष कार्यक्षम समुपदेशक विकसित करण्यावर भर दिला जाईल. १५ दिवसांच्या ऑफलाइन सत्रानंतर उमेदवारांना जिल्हा पातळीवरील शाळा किंवा महाविद्यालयाशी जोडून १ महिन्याचे प्रॅक्टिकल फिल्ड एक्सपोजर दिले जाईल. त्यानंतर पुढील ३ ते ५ महिने उमेदवारांना प्रत्यक्ष व्यवसायासाठीचे मॉनिटरिंग, मेंटरिंग, नियमित ऑनलाइन सत्र आणि व्यावसायिक सहाय्य पुरवले जाईल. हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल, युवक-युवतींनी या सुवर्णसंधीचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन तज्ज्ञ डॉ.कापसे यांनी केले आहे.

# कृषी दिनी राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांचे होणार वितरण; कृषी पुरस्कार उत्कृष्टतेचे प्रतिक : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

## राज्यस्तरीय कृषी पुरस्कार जाहीर; राज्यातील १८९ शेतकरी, संस्था व कृषी अधिकारी यांचा होणार सन्मान

**मुंबई** – राज्यातील कृषी, फलोत्पादन, सेंद्रिय शेती आणि कृषी क्षेत्रातील विविध उपक्रमांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शेतकरी, महिला शेतकरी, तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २०२३ व २०२४ चे राज्यस्तरीय कृषी पुरस्कार जाहीर केले आहेत. कृषी विकासासाठी केलेल्या योगदानाचा सन्मान करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. राज्यस्तरीय कृषी पुरस्कार हे कृषी क्षेत्रातील उत्कृष्टतेचे प्रतीक



असून नव्या पिढीला प्रेरणा देणारे आहेत. हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिनाचे औचित्य साधून बुधवार, १ जुलै २०२६ रोजी मुंबई येथे हा सोहळा होणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची भेट घेऊन या पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी निमंत्रण दिले. या निमंत्रणाचा स्विकार राज्यपाल यांनी केला असून त्यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड समिती बैठकीत पुरस्कारार्थींची निवड करण्यात आली असून शासनाने त्यास मान्यता दिली आहे. राज्यातील कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार, उत्पादनवाढ, शाश्वत शेती, सेंद्रिय शेती, फलोत्पादन आणि कृषी विस्तार क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यासाठी हे पुरस्कार दरवर्षी प्रदान करण्यात येतात.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली कृषी विभागाने राज्यातील विविध विभागांमधून कृषी क्षेत्रात उत्कृष्ट काम केलेल्या पुरस्कारार्थ्यांची निवड केली आहे. १ जुलै २०२६ रोजी २०२३ व २०२४ या दोन्ही वर्षांतील राज्यस्तरीय कृषी पुरस्कार विजेत्यांचा सन्मान एकत्रितपणे केला जाणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, सेंद्रिय शेती, फलोत्पादन आणि शाश्वत कृषी विकासासाठी कार्य करणाऱ्या सर्व पुरस्कारार्थींनी राज्यासाठी आदर्श निर्माण केला आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार, जिजामाता कृषिभूषण पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार, उद्यानपंडित पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (सर्वसाधारण गट), वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (आदिवासी गट), तसेच पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार आदी पुरस्कार देण्यात येणार आहेत. २०२३ व २०२४ साठी वरील पुरस्कारांसाठी एकूण १८९ पुरस्कारार्थींचा गौरव करण्यात येणार आहे. निवड झालेल्या पुरस्कार्थींचे कृषीमंत्री भरणे यांनी अभिनंदन केले आहे.

# संपादकीय

**यश हे एका दिवसात मिळत नाही, पण दररोज केलेल्या प्रामाणिक प्रयत्नातून ते नक्की घडते.**

## सामाजिक सलोखा आणि नागरिकांची जबाबदारी

समाज हा केवळ विटा, दगड आणि रस्त्यांनी बनत नसतो; तो माणसांच्या विचारांनी, परस्पर विश्वासाने आणि एकमेकांबद्दलच्या आदराने उभा राहतो. विविध धर्म, जाती, भाषा आणि संस्कृतींनी नटलेल्या भारतासारख्या देशात सामाजिक सलोखा ही केवळ एक संकल्पना नसून राष्ट्राच्या प्रगतीची मूलभूत गरज आहे. सलोखा टिकला तर विकासाला गती मिळते; मतभेदांनी संघर्षाचे रूप घेतले तर प्रगतीची वाट खडतर होते.

आजच्या माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात जग जवळ आले आहे, पण माणसामाणसांतील अंतर वाढत असल्याची खंतही व्यक्त केली जाते. सोशल मीडियावरील एका चुकीच्या संदेशामुळे समाजात गैरसमज निर्माण होऊ शकतात. अनेकदा सत्यापेक्षा अफवा वेगाने धावते आणि विवेकापेक्षा भावना आधी प्रतिक्रिया देतात. अशा वेळी प्रत्येक नागरिकाने जबाबदारीची जाणीव ठेवणे अत्यंत आवश्यक ठरते.

लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित नसते. ती दैनंदिन जीवनातील वर्तनातूनही दिसून येते. सार्वजनिक ठिकाणी शिस्त पाळणे, कायद्याचा आदर करणे, इतरांच्या भावना समजून घेणे आणि मतभेद असले तरी संयम राखणे ही सुद्धा नागरिकांची जबाबदारीच आहे. समाजात शांतता आणि सौहार्द राखण्यासाठी प्रशासन जितके महत्त्वाचे आहे, तितकाच सामान्य नागरिकही महत्त्वाचा घटक आहे. सण-उत्सव, धार्मिक कार्यक्रम आणि सार्वजनिक उपक्रम हे समाजाला एकत्र आणण्याची संधी असतात. मात्र अशा प्रसंगी परस्पर सहकार्य, समन्वय आणि संवेदनशीलता जपणे आवश्यक आहे. विविधतेचा आदर करणे ही भारतीय संस्कृतीची ओळख आहे. ही परंपरा टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येकाने आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे. समाजातील तणाव, द्वेष आणि विभाजनाच्या प्रवृत्तींपेक्षा प्रेम, विश्वास आणि बंधुभावाच्या मूल्यांना अधिक बळ देण्याची गरज आहे. सामाजिक सलोखा ही सरकार किंवा प्रशासनाची एकट्याची जबाबदारी नाही; ती प्रत्येक घराची, प्रत्येक कुटुंबाची आणि प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आजच्या काळात विकास, शिक्षण, रोजगार आणि सामाजिक प्रगती यांसारख्या विषयांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. समाज एकत्र राहिला तर कोणतेही आव्हान मोठे नसते. परस्पर आदर, सहिष्णुता आणि जबाबदार नागरिकत्व यांच्या आधारावरच मजबूत, सुसंस्कृत आणि प्रगत भारताची उभारणी शक्य आहे. सामाजिक सलोखा हा योगायोगाने निर्माण होत नाही; तो जपावा लागतो, वाढवावा लागतो आणि पुढील पिढीकडे मूल्य म्हणून सोपवावा लागतो. कारण समाजातील शांतता हीच विकासाची पहिली अट आहे आणि जबाबदार नागरिक हीच त्या शांततेची खरी हमी आहे. शेवटी, समाजातील शांतता, विकास आणि प्रगती यांचा पाया परस्पर विश्वासावर उभा असतो. जेथे बंधुभाव आहे तेथे विकास आहे, जेथे सहकार्य आहे तेथे यश आहे आणि जेथे सामाजिक सलोखा आहे तेथेच उज्ज्वल भविष्य आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने 'मी समाजासाठी काय करू शकतो?' हा प्रश्न स्वतःला विचारून त्यानुसार कृती करणे, हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.

# इतिहास, प्रेरणा आणि वर्तमानाची जाणीव



वर्षातील प्रत्येक दिवस काही ना काही ऐतिहासिक, सामाजिक किंवा सांस्कृतिक महत्त्व घेऊन येत असतो. २४ जून हाही त्याला अपवाद नाही. इतिहासाच्या पानांमध्ये डोकावून पाहिले तर हा दिवस अनेक घटनांचा साक्षीदार ठरलेला आहे. अशा दिवसांचे स्मरण करणे म्हणजे केवळ भूतकाळाचा आढावा घेणे नव्हे, तर त्यातून वर्तमानासाठी दिशा आणि भविष्याकरिता प्रेरणा घेणे होय.

मानवजातीच्या प्रगतीचा इतिहास हा संघर्ष, संशोधन, सामाजिक परिवर्तन आणि नवसृजन यांचा इतिहास आहे. प्रत्येक महत्त्वाच्या दिवसामागे एखादी घटना, व्यक्तिमत्त्व किंवा चळवळ दडलेली असते. या घटनांचे स्मरण समाजाला त्याच्या मुळांची ओळख करून देते. बदलत्या काळात आधुनिकतेचा स्वीकार करताना इतिहासाशी असलेले नाते तितकेच महत्त्वाचे ठरते.

आजच्या धकाधकीच्या जीवनात अनेकदा आपण इतिहासातील महत्त्वाच्या घटनांकडे दुर्लक्ष करतो. परंतु इतिहास हा केवळ तारखा आणि घटनांचा संग्रह नसतो; तो समाजाच्या अनुभवांचा आणि शिकवणींचा खजिना असतो. भूतकाळातील यश-अपयश, संघर्ष आणि त्यातून घडलेले परिवर्तन यांचा अभ्यास केल्यास वर्तमानातील अनेक प्रश्नांची उत्तरे सापडू शकतात.

२४ जूनसारखे दिवस आपल्याला स्मरण करून देतात की, समाजाच्या प्रगतीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, दूरदृष्टी आणि एकजूट आवश्यक असते. इतिहास घडवणाऱ्या व्यक्तींनी परिस्थितीशी झुंज देत समाजासाठी कार्य केले. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आजच्या पिढीनेही सकारात्मक बदल घडविण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

देशाच्या विकासासाठी शिक्षण, विज्ञान, सामाजिक सलोखा, पर्यावरण संवर्धन आणि लोकशाही मूल्यांचे जतन या बाबींना प्राधान्य देणे आवश्यक आहे. भूतकाळातील घटनांचे स्मरण हे केवळ औपचारिकता न राहता त्यातून बोध घेण्याची वृत्ती विकसित झाली पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाने आपल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे योगदान दिल्यास विकासाचा प्रवास अधिक वेगाने होऊ शकतो.

२४ जूनचा दिवस आपल्याला आणखी एक महत्त्वाचा संदेश देतोङ्घकाळ सतत पुढे सरकत असतो. प्रत्येक दिवस नवी संधी घेऊन येतो. समाज, राष्ट्र आणि स्वतःच्या प्रगतीसाठी आपण काय योगदान देऊ शकतो, याचा विचार करण्याची ही योग्य वेळ आहे. इतिहासाचे स्मरण, वर्तमानाचे भान आणि भविष्याची तयारी यांचा समतोल साधणारा समाजच खऱ्या अर्थाने प्रगत होऊ शकतो.

म्हणूनच २४ जून हा केवळ दिनदर्शिकेतील आणखी एक दिवस नसून, आत्मपरीक्षण, प्रेरणा आणि नव्या संकल्पांचा दिवस म्हणून साजरा केला गेला पाहिजे. इतिहासातून बोध घेत वर्तमान अधिक सक्षम आणि भविष्य अधिक उज्ज्वल करण्याचा संकल्प हाच या दिवसाचा खरा संदेश आहे.

आजच्या पिढीसमोर माहितीचे अमर्याद विश्व खुले झाले आहे. एका क्लिकवर जगभरातील घटना, संशोधन आणि घडामोडी उपलब्ध होतात. मात्र माहितीचा हा महासागर समजून घेताना इतिहासाचे भान आणि सामाजिक मूल्यांची जपणूक तितकीच आवश्यक ठरते. २४ जूनसारखे दिवस आपल्याला स्मरण करून देतात की, कोणताही समाज आपल्या भूतकाळापासून तुटून प्रगती करू शकत नाही. इतिहास हा केवळ अभिमानाचा विषय नसून भविष्य घडविण्याचा मार्गदर्शक असतो.

राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत प्रत्येक पिढीची भूमिका महत्त्वाची असते. आपल्या पूर्वजांनी संघर्ष, त्याग आणि कठोर परिश्रमातून समाजाला दिशा दिली. आज त्या वारशाचे जतन करणे आणि त्यात नवीन मूल्यांची भर घालणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. सामाजिक समता, बंधुभाव, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लोकशाही मूल्ये यांची जपणूक करूनच आपण प्रगत राष्ट्राचे स्वप्न साकार करू शकतो.

२४ जूनचा दिवस आपल्याला वेळेचे महत्त्वही शिकवतो. गेलेला काळ परत येत नाही, पण त्यातून मिळालेला अनुभव भविष्यातील निर्णय अधिक सक्षम बनवतो. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र या तिन्ही स्तरांवर सातत्यपूर्ण प्रयत्न आणि सकारात्मक विचारांची आवश्यकता असते. प्रत्येक दिवस नवी सुरुवात करण्याची संधी देतो आणि प्रत्येक संधीचा उपयोग प्रगतीसाठी करणे हेच यशाचे गमक आहे.

आज समाजासमोर पर्यावरणीय आव्हाने, तंत्रज्ञानातील बदल, रोजगाराचे प्रश्न आणि सामाजिक समन्वयाची गरज अशी अनेक आव्हाने आहेत. या पार्श्वभूमीवर इतिहासातून प्रेरणा घेऊन वर्तमानातील समस्यांवर उपाय शोधणे आवश्यक आहे. भूतकाळातील अनुभव आणि आधुनिक ज्ञान यांचा संगम साधणारा समाजच भविष्यात यशस्वी ठरतो.

अशा विशेष दिवसांचे स्मरण केवळ कार्यक्रम आणि औपचारिकतेपुरते मर्यादित राहू नये. त्यातून समाजात जागरूकता, प्रेरणा आणि सकारात्मक विचारांची निर्मिती झाली पाहिजे. प्रत्येक दिवस काहीतरी नवीन शिकण्याची, स्वतःमध्ये सुधारणा करण्याची आणि समाजासाठी योगदान देण्याची संधी आहे. २४ जून हा दिवसही त्याच संदेशाची पुनरावृत्ती करतो.

इतिहासाची जाणीव, वर्तमानाची जबाबदारी आणि भविष्याची तयारी या त्रिसूत्रीवरच राष्ट्राची प्रगती अवलंबून असते. म्हणूनच २४ जून हा दिवस प्रत्येकाने आत्मपरीक्षण, नवसंकल्प आणि सकारात्मक कृतीचा दिवस म्हणून साजरा करावा. कारण बदलाची सुरुवात नेहमी एका विचारातून आणि एका दिवसातूनच होत असते.

दिनदर्शिकेतील प्रत्येक तारीख ही काळाच्या प्रवाहातील एक टप्पा असते. काही तारखा इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदल्या जातात, तर काही तारखा समाजाला आत्मपरीक्षणाची संधी देतात. २४ जून हा दिवस अशाच स्मरण, चिंतन आणि नव्या उमेदीचा संदेश देणारा दिवस मानला जाऊ शकतो.


आजचा काळ हा वेग, स्पर्धा आणि तंत्रज्ञानाचा आहे. जग झपाट्याने बदलत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल क्रांती, औद्योगिक परिवर्तन आणि जागतिकीकरणामुळे जीवनशैलीत मोठे बदल होत आहेत. अशा वेळी समाजाने आपल्या मूल्यांची जपणूक करणे तितकेच महत्त्वाचे ठरते. आधुनिकतेचा स्वीकार करताना संस्कृती, परंपरा आणि सामाजिक जबाबदारी यांचा विसर पडता कामा नये.

२४ जूनसारखा दिवस आपल्याला एक महत्त्वाचा प्रश्न विचारण्यास भाग पाडतोङ्घगेल्या वर्षभरात आपण समाजासाठी, कुटुंबासाठी आणि स्वतःच्या विकासासाठी काय योगदान दिले? प्रगती ही केवळ आर्थिक निकषांवर मोजली जात नाही. नैतिकता, प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी आणि मानवी मूल्ये ही देखील प्रगतीची तितकीच महत्त्वाची परिमाणे आहेत.

आजच्या तरुण पिढीवर देशाचे भविष्य अवलंबून आहे. युवकांमध्ये प्रचंड ऊर्जा, कल्पकता आणि परिवर्तन घडविण्याची क्षमता आहे. या क्षमतेचा उपयोग विधायक कार्यासाठी झाला तर देश विकासाच्या नव्या उंचीवर पोहोचू शकतो. शिक्षण, संशोधन, उद्योजकता आणि सामाजिक कार्य या क्षेत्रांत युवकांनी सक्रिय सहभाग नोंदविणे ही काळाची गरज आहे.

समाजातील एकता आणि बंधुभाव हे कोणत्याही राष्ट्राचे खरे सामर्थ्य असते. जात, धर्म, भाषा आणि प्रांत यांच्या पलीकडे जाऊन राष्ट्रीय हिताला प्राधान्य देणे आवश्यक आहे. सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. मतभेद असले तरी मनभेद होऊ नयेत, हा लोकशाहीचा मूलमंत्र आहे.पर्यावरण संवर्धन हे देखील आजच्या काळातील सर्वात मोठे आव्हान बनले आहे. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांचा अतिरेकी वापर यामुळे भविष्यात गंभीर संकटे निर्माण होऊ शकतात. त्यामुळे विकासासोबत पर्यावरणाचा समतोल राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.२४ जूनचा दिवस आपल्याला हेच शिकवतो की, काळ कोणासाठीही थांबत नाही. प्रत्येक दिवस नवे आव्हान आणि नवी संधी घेऊन येतो. त्या संधींचे सोनं करण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन, कठोर परिश्रम आणि समाजाप्रती बांधिलकी आवश्यक असते. इतिहासाची जाणीव, वर्तमानाचे भान आणि भविष्याची तयारी या त्रिसूत्रीवर व्यक्ती, समाज आणि राष्ट्राची वाटचाल अवलंबून असते. त्यामुळे २४ जून हा दिवस केवळ दिनदर्शिकेतील एक तारीख न मानता आत्मचिंतन, प्रेरणा आणि नव्या संकल्पांचा दिवस म्हणून साजरा करण्याची गरज आहे. कारण उद्याचा इतिहास आजच्या कृतीतूनच घडत असतो.

# दूरदृष्टी, धाडस आणि यशाची गाथा : उद्योगपती गौतम अदानी



२४ जून हा भारतातील आघाडीचे उद्योगपती गौतम अदानी यांचा वाढदिवस. उद्योग, पायाभूत सुविधा, ऊर्जा आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत त्यांनी भारतीय उद्योगविश्वात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या प्रेरणादायी प्रवासाकडे पाहणे महत्त्वाचे ठरते.

गुजरातमधील अहमदाबाद येथे २४ जून १९६२ रोजी जन्मलेल्या गौतम अदानी यांनी अत्यंत सामान्य परिस्थितीतून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. व्यावसायिक दृष्टिकोन, कठोर परिश्रम आणि दूरदृष्टी यांच्या जोरावर त्यांनी उद्योग क्षेत्रात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. व्यापार क्षेत्रातून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज जागतिक स्तरावरील उद्योग समूहाच्या नेतृत्वापर्यंत पोहोचला आहे.

अदानी समूहाने बंदरे, विमानतळ, ऊर्जा, सौर ऊर्जा, नैसर्गिक वायू, सिमेंट, डेटा सेंटर्स आणि पायाभूत सुविधा अशा विविध क्षेत्रांत मोठी गुंतवणूक केली आहे. देशाच्या आर्थिक विकासात योगदान देणाऱ्या प्रमुख उद्योग समूहांमध्ये अदानी समूहाचा समावेश केला जातो. विशेषतः देशातील बंदर विकास आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे.

गौतम अदानी यांचे यश केवळ आर्थिक वाढीपुरते मर्यादित नाही. रोजगार निर्मिती, आधुनिक पायाभूत सुविधा उभारणी आणि नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार यांमधून त्यांनी देशाच्या विकासाला चालना देण्याचा प्रयत्न केला आहे. उद्योगासोबतच सामाजिक उत्तरदायित्वाच्या विविध उपक्रमांमध्येही अदानी फाऊंडेशन सक्रियपणे कार्यरत आहे. शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास आणि ग्रामीण विकास क्षेत्रात संस्था विविध प्रकल्प राबवत आहे. व्यवसाय क्षेत्रात अनेक चढ-उतार, आव्हाने आणि स्पर्धांचा सामना करत त्यांनी आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित ठेवले. बदलत्या आर्थिक परिस्थितीशी जुळवून घेत नव्या संधींचा शोध घेण्याची त्यांची वृत्ती अनेक उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरते.

आजच्या तरुण पिढीसाठी गौतम अदानी यांचा प्रवास हा जिद्द, चिकाटी आणि मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा देणारा आहे. यशाचा कोणताही शॉर्टकट नसतो, हे त्यांच्या जीवनप्रवासातून स्पष्ट होते. सातत्यपूर्ण प्रयत्न, दूरदृष्टी आणि निर्णयक्षमता यांच्या बळावर सामान्य कुटुंबातील एक युवक जागतिक उद्योगविश्वात आपले नाव निर्माण करू शकतो, याचे ते जिवंत उदाहरण आहेत.

गौतम अदानी यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि भविष्यातील यशस्वी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांच्या कार्यातून देशाच्या विकासाला नवी दिशा मिळत राहो, हीच सदिच्छा.

भारतातील उद्योगविश्वात गेल्या काही दशकांत ज्यांनी आपल्या दूरदृष्टी, जिद्द आणि धाडसी निर्णयक्षमतेच्या जोरावर वेगळी ओळख निर्माण केली, त्यामध्ये गौतम अदानी यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. २४ जून हा त्यांचा वाढदिवस असून या निमित्ताने त्यांच्या कार्याचा आणि योगदानाचा आढावा घेणे औचित्यपूर्ण ठरते. अत्यंत साध्या कुटुंबातून आलेल्या गौतम अदानी यांनी व्यवसाय क्षेत्रात प्रवेश करताना मोठ्या आव्हानांचा सामना केला. परंतु कठोर परिश्रम, आत्मविश्वास आणि नव्या संधी ओळखण्याची क्षमता यांच्या जोरावर त्यांनी स्वतःचे उद्योगविश्व उभे केले. आज अदानी समूह हा भारतातील प्रमुख व्यावसायिक समूहांपैकी एक मानला जातो. देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये पायाभूत सुविधांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. बंदरे, विमानतळ, ऊर्जा निर्मिती, वाहतूक व्यवस्था आणि लॉजिस्टिक्स या क्षेत्रांत अदानी समूहाने केलेली गुंतवणूक देशाच्या विकासाला गती देणारी ठरली आहे. विशेषतः जागतिक स्पर्धेच्या युगात भारताला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी आधुनिक पायाभूत सुविधा उभारण्याची आवश्यकता आहे. या क्षेत्रात गौतम अदानी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. व्यवसायातील यशामागे केवळ आर्थिक गुंतवणूक नसते, तर त्यामागे दीर्घकालीन दृष्टीकोन आणि नेतृत्वगुण असतात. बदलत्या परिस्थितीत योग्य निर्णय घेणे, संकटांवर मात करणे आणि नवीन क्षेत्रांमध्ये संधी शोधणे ही त्यांची विशेषता मानली जाते. त्यामुळेच अनेक तरुण उद्योजक त्यांच्याकडे प्रेरणास्थान म्हणून पाहतात. उद्योग क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रातही अदानी फाऊंडेशन विविध उपक्रम राबवत आहे. ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य सेवा आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये अनेक प्रकल्प कार्यरत आहेत. उद्योग आणि समाज यांच्यातील संतुलन राखण्याचा प्रयत्न त्यांच्या कार्यातून दिसून येतो. आज भारत जगातील वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. या विकासयात्रेत उद्योगपती, उद्योजक आणि नवोन्मेषक यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. गौतम अदानी यांचा प्रवास हा मोठी स्वप्ने पाहणाऱ्या आणि ती पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना निरोगी आयुष्य, उत्तम आरोग्य आणि भविष्यातील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा. भारताच्या आर्थिक प्रगतीत त्यांचे योगदान असेच वाढत राहो, हीच सदिच्छा.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# न्यू ऑरेंज सिटीमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**वरुड** – न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्राचार्या माधुरी भोंडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाला सुरुवात झाली. शाळा समन्वयक श्वेता गणोरकर, पीआरओ किशोर देशमुख, प्रायमरी विभाग प्रमुख पराग भोंडे, योगा शिक्षक रोशन यावले उपस्थित होते. योगा शिक्षिका स्वाती साबरे यांनी योग दिनाचे औचित्य साधून शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सामुहिक योगाभ्यास घेऊन योगाचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने करण्यात आली. त्यानंतर विविध योगासने, प्राणायाम व सूर्यनमस्कार यांचे प्रात्यक्षिक करुन दाखविण्यात आले. योगामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते तसेच एकाग्रता, आत्मविश्वास व सकारात्मक विचारसरणी विकसित होते, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. माधुरी भोंडे यांनी नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले. योग हा निरोगी जीवनाचा पाया असून प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करावा, असे त्यांनी सांगितले. संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया, सचिव अनिल गुल्हाने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, सहसचिव शाम खंडेलवाल, सदस्य विनय यावलकर या सर्वांनी योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



# पहाट पक्षी मित्र मंडळातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



*__वरुड__ – स्थानिक पहाट पक्षी मित्र मंडळाच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भव्य योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. धनोडी रस्त्यावरील 'देवते टाइल्स' परिसर येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमात मंडळाच्या सदस्यांसह परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामूहिक योगसाधना केली.*

*'करो योग, रहो निरोग' चा संदेश देत सकाळी ठीक ६ वाजता या योग शिबिराला सुरुवात झाली. निसर्गरम्य वातावरणात आणि पहाट पक्ष्यांच्या किलबिलाटात उपस्थितांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा केली. आजच्या धावपळीच्या युगात शरीर आणि मन सुदृढ ठेवण्यासाठी योग किती आवश्यक आहे, यावर या प्रसंगी प्रकाश टाकण्यात आला. पहाट पक्षी मित्र मंडळाचे अध्यक्ष श्याम केंडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, निरोगी आणि आनंदी आयुष्यासाठी योग हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता प्रत्येकाने तो आपल्या दैनंदिन जीवनशैलीचा भाग बनवला पाहिजे. मंडळाच्या सर्व सदस्यांनी वेळेवर उपस्थित राहून शिबिर यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. सकाळी ६ ते ७ या वेळेत चाललेल्या या शिबिराची सांगता उपस्थितांना सुदृढ आरोग्याचा संकल्प आणि हिरामण आंडे यांनी सर्वांना अल्पहार देऊन करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पहाट पक्षी मित्र मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी परिश्रम घेतले.*

# आपत्तीपश्चात पुनर्बांधणीसाठी वैज्ञानिक मूल्यांकनावर भर द्यावा : मुख्यमंत्री फडणवीस

## राज्य आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठकीत निर्देश

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – राज्य शासनाच्या विभागांमधील कामकाज अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि लोकाभिमुख करण्यासाठी 'महा एआय' – प्रगत कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी 'महाराष्ट्र हब' हा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित देशातील पहिलाच अभिनव उपक्रम विकसित करण्यात आला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. लवकरच या उपक्रमाची अंमलबजावणी राज्यातील विविध विभागात होणार असून या माध्यमातून शासकीय कामकाजातील पत्रव्यवहार, टिपण्या, अहवाल तयार करणे, शासकीय कामांचे भाषांतर, दस्तऐवजांचे सारांश तसेच शासकीय ज्ञानभांडारातील माहिती शोधणे यांसारखी कामे अधिक वेगाने आणि अचूकपणे करता येणार असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानभवन येथे महा एआय प्लॅटफॉर्मबाबत बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता,वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, प्रधान सचिव नवीन सोना, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, महाआयटीच्या संचालक भुवनेश्वरी एस,राज्य सूचना माहिती अधिकारी व उपमहासंचालक सपना कपूर यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील शासकीय यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत प्रशासन अधिक परिणामकारक करण्यासाठी 'महा एआय' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राने महाराष्ट्रासाठी ही प्रणाली विकसित केली असून ती इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य डेटा सेंटरच्या पायाभूत सुविधांवर कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे शासकीय माहितीचे सार्वभौमत्व, गोपनीयता व सुरक्षितता सुनिश्चित होणार आहे. सर्व संवेदनशील शासकीय माहिती शासनाच्या स्वतःच्या नियंत्रणाखाली राहणार असून, माहितीची साठवणूक व प्रक्रिया राज्य शासनाच्या सुरक्षित अधोसंरचनेमध्येच केली जाणार आहे. 'महा एआय'' प्रणालीद्वारे अधिकृत पत्रे, ई-मेल, टिपण्या तयार करणे, दस्तऐवजांचे संक्षिप्तीकरण, स्पष्टीकरण व भाषांतर, शासकीय नियम, अधिनियम, शासन निर्णय आणि परिपत्रकांवरील संदर्भाधारित माहिती शोधणे तसेच नैसर्गिक भाषेत अहवाल तयार करणे शक्य होणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, भविष्यात 'महा एआय'चा वापर सर्व शासकीय विभागांमध्ये एकसमान एआय प्लॅटफॉर्म म्हणून करण्यात येणार आहे. तसेच ई-ऑफिस, आरटीआय, ई-एचआरएमएस, आपले सरकार यांसारख्या विविध ई-शासन प्रणालींशी त्याची जोडणी करून मसुदा तयार करणे, भाषांतर, सारांश, ज्ञानसंकलन आणि लाभार्थी पडताळणी यांसारख्या सुविधा अधिक सक्षम करण्यात येतील.

# क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे माहिती शिक्षण संचालक डॉ.महेश पालकर यांचे आवाहन

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – राज्य शासनाने २०२५-२६ च्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी ऑनलाईन आवेदने मागविण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी २७ जून, २०२६ रोजी सकाळी १० वाजेपासून htt{s://forms.gle/EgZ266AqN>DxF$JDZW8 या लिंकवर नावनोंदणी सुरू करण्यात येणार आहे. या अनुषंगाने राज्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व मान्यताप्राप्त अनुदानित खाजगी प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळांमधील



इच्छुक शिक्षकांनी दिनांक १० जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ऑनलाईन आवेदन करावे, असे आवाहन शिक्षण संचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

शिक्षण हा समाजाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षकांमुळेच समाज अणि राज्याचा तसेच राष्ट्राचा विकास होतो. अशा समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षकांना राज्य शासनाच्या वतीने दरवर्षी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराने गौरविले जात असल्याची माहिती शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ.महेश पालकर यांनी दिली आहे.

# 'अमृत मानस मित्र' प्रशिक्षणातून मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***मुंबई*** – विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, भावनिक सक्षमीकरण आणि समुपदेशन सेवा अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने 'अमृत मानस मित्र' समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येत आहे. पहिल्या बॅचसाठी अर्जदारांना २९ जून २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज करता येईल. मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या युवक-युवतींसाठी हा उपक्रम महत्त्वाची संधी ठरणार आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (एमआयएमएच), पुणे ही महाराष्ट्र शासनाची अग्रगण्य संस्था तांत्रिक व शैक्षणिक भागीदार म्हणून कार्यरत राहणार आहे. मानसिक आरोग्य, विद्यार्थी समुपदेशन, भावनिक आधार, संवाद कौशल्ये, सक्रिय ऐकणे, सहानुभूतीपूर्ण प्रतिसाद, संकट व्यवस्थापन, जीवनकौशल्ये आणि मानससामाजिक सहाय्य या विषयांवर आधारित हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

**प्रशिक्षण कोण घेणार?**

संपूर्ण प्रशिक्षण महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (एमआयएमएच), पुणे या महाराष्ट्र शासनाच्या संस्थेच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांद्वारे दिले जाईल.



**वरुड** : अमरावती विधानपरिषद निवडणुकीत भरघोष अशा मतांनी निवडुन आल्याबददल प्रविण पोटे पाटील यांना पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना भाजपा गटनेता तथा नगरसेवक किरण सावरकर, बांधकाम समिती सभापती जीवन मालपे, नगरसेवक गौरव इंगळे, संदीप देवते, ॲड.योगेश चौधरी.

# नुकसानीच्या आकडेवारीसाठी ड्रोनचा वापर करा : मुख्यमंत्री

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*




**मुंबई** – राज्यातील सर्वाधिक मूल्य असलेल्या पिकांच्या नैसर्गिक आपत्तीत होणा-या नुकसानीची अचूक आकडेवारी मिळिवण्यासाठी आगामी कालावधीत कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन यांनी संयुक्तरित्या ड्रोनचे सर्वेक्षण करण्यासाठी कार्यवाही करावी. यामुळे शेतक-यांना झालेल्या नुकसानीची अचूक माहिती मिळेल व पीक विमा कंपन्यांना भरपाई देताना कोणतीही अडचण येणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राज्यातील केळी पिकांच्या नुकसानीबाबत विमा कंपन्यांनी स्थानिक प्रशासनाने केलेली नोंद तपासून घ्यावी. रियल टाइम डाटा, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरचा डाटा आणि सॅटेलाइट डाटा तपासून घेऊन तात्काळ भरपाईची कार्यवाही करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

जळगाव जिल्ह्यातील केळीबाग नुकसानीसंदर्भात विधान भवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# अन्न, नागरी पुरवठा विभागाने शिवभोजन थाळी योजनेचा अधिक विस्तार करण्याची गरज : आ. संजय खोडके

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



***मुंबई*** – महाराष्ट्र शासनाची शिवभोजन थाळी योजना गरीब आणि गरजू लोकांसाठी अत्यंत फायदेशीर आहे. कोरोनाकाळात या योजनेचे महत्व अधोरेखित झाले असून आज गरीब ,गरजू व श्रमजीवी वर्गाला या थाळी योजनेमुळे पोट भरण्याची सोय मिळाली आहे. बाजार समिती , सरकारी हॉस्पिटल अशा ठिकणी लाभार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने आज शिवभोजन योजनेचा विस्तार करून आवश्यक बदल करून योजनेचा निष्ठांक व अनुदान वाढविण्याची मागणी आ.संजय खोडके यांनी विधान परिषदेतून केली आहे.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात झाली असून आज मंगळवार दिनांक २३ जून २०२६ रोजी वरिष्ठ सभागृहातील दुसऱ्या दिवसाच्या कामकाजादरम्यान अन्न, नागरी व ग्राहक संरक्षण विभागाच्या संबंधित प्रश्नावर चर्चा सुरु असतांना आ.संजय खोडके यांनी याबाबतचा मुद्दा उपस्थित केला.

आ. संजय खोडके यांनी सांगितले कि, कोरोना काळापासून शिव भोजन थाळी योजना सुरु करण्यात आली असून गरीब व गरजू घटकांकरिता हि योजना अत्यंत फायदेशीर आहे. या योजनेअंतर्गत अवघ्या १० रुपयांमध्ये २ चपात्या, १ वाटी भाजी, १ वाटी वरण आणि १ मूद भात दिला जातो. खऱ्या अर्थाने रुग्णालय परिसर व बाजार समिती भागात या योजना सुरु असल्याने गरीब , गरजू व श्रमजीवी वर्गाला जेवणाची सोय मिळाली असल्याने हि एक शासनाची अत्यंत चांगली योजना आहे. पुढेही हि योजना अशीच सुरु राहण्यासाठी व जास्तीतजास्त गरजूंना याचा लाभ मिळण्यासाठी आणखीन नवीन शिव भोजन केंद्र वाढविण्याची गरज आहे. तसेच शिवभोजन थाळीतील पदार्थामध्ये काही पौष्टिक व पोषणयुक्त पदार्थांचा समावेश करण्यात यावा. आजच्या महागाईप्रमाणे शिव भोजन केंद्र चालकांना अनुदान देण्यात यावे, हि योजना बंद होऊ नये म्हणून नियमित अनुदान देणे सुद्धा आवश्यक आहे. याकरिता योजनेचा विस्तार करण्यास आवश्यक बदल करण्याची मागणी करीत आ.संजय खोडके यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

# वर्धा सामान्य रुग्णालयाच्या आयुष विभागात डॉ.कल्पना सुनतकरी यांच्या उपस्थितीत योग दिन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वर्धा** – जागतिक योग दिनानिमित्त सामान्य रुग्णालयातील आयुष विभागात अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कल्पना सुनतकरी यांच्या उपस्थितीत योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी बाल रोगतज्ञ डॉ. संजय गाठे, नेत्ररोग तज्ञ डॉ. मोहन सुटे, जयश्री मिसाळ, अपुर्वा सरदार यांची उपस्थिती होती. आयुष विभागाचे योग शिक्षक डॉ. शंकर तायडे यांनी



उपस्थितांना योग प्रात्याक्षिके करुन आसने करुन घेतली. यावेळी डॉ. कल्पना सुनतकरी व डॉ. संजय गाठे यांनी उपस्थितांना योगदिन व दैनंदिन जिवनातील योगाचे महत्व सांगितले. तसेच आयुष विभागात नियमित सकाळी ९ ते १० वेळात सुरु असलेल्या योग वर्गाचा कर्मचारी, अधिकारी व रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

योग सप्ताहांतर्गत योगतज्ञ डॉ.शंकर तायडे यांनी महिला आरोग्य व योग, किशोरवयीन मुलींसाठी योग संस्कार, सुदृढ आरोग्यासाठी योग, वार्धक्याकरीता योग, बौध्दिक विकास व योग, मानसिक स्वास्थाकरीता योग या संबंधित व्याख्याने घेण्यात आली.

कार्यक्रमाचे आभार डॉ. नम्रता सलुजा यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ.आश्विनी डोणे, मनिषा कलवडे, अरुणा भागवत, दिव्या कनेरी, इतर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तसेच नर्सिग स्कुलच्या विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी,
वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-२७०/२०२५-२६ दि.२६/०५/२०२६**

**-: जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **श्रीमती अरुणा वामन घोरपडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी ग्रामपंचायत/नगर परिषद **ढगा, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **श्रीमती स्वत: नामे अरुणा वामन घोरपडे, रा.अमरावती, ता.जि.अमरावती, यांचा मृत्यू दि.०५/०७/१९६२** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे. सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. आज रोजी २६/०५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार
वरुड**

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी,
वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-२३९/२०२५-२६ दि.२६/०५/२०२६**

**-: जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **श्रीमती रमेश नारायण हरले रा.मालखेड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी ग्रामपंचायत/नगर परिषद **मालखेड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **श्री मुलगा नामे प्रतिक रमेशराव हरले, रा.मालखेड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा मृत्यू दि.०८/०९/२०००** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. आज रोजी २६/०५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार
वरुड**

# श्री क्षेत्र कौंडण्यपूर माता रुक्मिणी पालखी यात्रेचे तपोवन गेट-विद्यापीठ चौकात स्वागत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***अमरावती*** – विदर्भाची कुलस्वामिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील माता रुक्मिणीच्या पालखी सोहळ्याला ऐतिहासिक. अलौकिक व गौरवशाली अशी धार्मिक व अध्यात्मिक परंपरा लाभली आहे. आषाढी एकादशीला श्री. क्षेत्र पंढरपूर मध्ये दाखल होणारी विदर्भातील ही एकमेव मानाची पालखी असून, ही परंपरा चार शतकांहून अधिक काळापासून अखंडपणे सुरू आहे. कौंडण्यपूर ते पंढरपूर हा पालखी सोहळा केवळ धार्मिक परंपरा नसून विदर्भाच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारसाचे प्रतीक आहे. ही परंपरा आजही समस्त वारकऱ्यांना भक्ती, श्रद्धा आणि संस्कारांची प्रेरणा देत



आहे. असे प्रतिपादन शोध प्रतिष्ठान अमरावतीचे अध्यक्ष श्री. यश सुलभा संजय खोडके यांनी केले.

श्री. क्षेत्र कौंडण्यपूर या माता रुक्मिणी मातेचे माहेरातून लेकीला सासरी पंढरपूर पाठविण्याच्या परंपरेनुसार श्री. क्षेत्र पंढरपूरकडे मार्गस्थ झालेली श्री. रुख्मिणी मातेची ४३२ वी पालखी यात्रा आज दिनांक २२ जुन रोजी अमरावती शहरात दाखल झाली. टाळ, मृदंग, वीणेचा नाद आणि रुक्मिणीमातेचा जयघोष अशा भक्तिमय वातावरणात या पालखी सोहळ्याचे तपोवन गेट -विद्यापीठ चौक येथे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी शोध प्रतिष्ठान अमरावतीचे अध्यक्ष श्री. यश सुलभा संजय खोडके यांनी पालखीचे स्वागत, पुजन व दर्शन घेऊन श्रींचे कृपाशिर्वाद घेतले. तसेच विश्व कल्याणाची मनोकामना करीत बळीराजा सुखावण्यासाठी धो-धो पाऊस पडू दे,अशी श्रींच्या चरणी प्रार्थना केली. दरम्यान रांगोळ्या, फुलांची उधळण, आतिषबाजी करून समस्त वारीचे स्वागत करीत पुढील प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी यश खोडके यांनी पालखीला आपल्या खांद्यावर घेऊन पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ केले. यावेळी टाळ, मृदंग, वीणेचा नाद आणि रुक्मिणीमातेचा जयघोष यामुळे अमरावतीनगरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली असल्याचे चित्र दिसून आले. या पालखी सोहळ्याला शोध प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सहकारी तसेच पंचक्रोशीतील वारकरी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ७ तालुका बीज गुणन केंद्रांवर बीजोत्पादन कार्यक्रमासह सूर्यफूल व मका पिकांची प्रात्यक्षिके

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वर्धा** – शेतकऱ्यांना वेळेवर व दर्जेदार प्रमाणित बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी खरीप हंगाम २०२६ मध्ये जिल्ह्यातील सात तालुका बीज गुणन केंद्रांवर महाराष्ट्र



राज्य बियाणे महामंडळ याांच्या माध्यमातून ब्रिडर व पायाभूत बियाण्यांचा बीजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. उत्पादन साखळीमध्ये बियाणे हा अत्यंत महत्वाचा घटक असून दर्जेदार बियाण्यांच्या वापरामुळे पीक उत्पादन व उत्पादकतेत लक्षणीय वाढ होण्यास मदत होते. याच अनुषंगाने कृषी विद्यापीठामार्फत प्रसारित करण्यात आलेल्या सोयाबीनच्या पीडीकेव्ही अंबा या वाणाचा तसेच तूर पिकाच्या तृप्ती व रेणुका या सुधारित वाणांचेही बीजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

आर्वी तालुक्यातील लाडणापूर, तळेगाव, विरुळ, सेलू तालुक्यातील सेलू, सुकळी स्टेशन, वर्धा तालुक्यातील सेलसुरा व देवळी तालुक्यातील नाचनगाव येथे सोयाबीन व तुर पिकाच्या अंबा व तृप्ती या वाणाचे बीजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यावर्षी खरीप हंगामात ७ तालुका बीज गुणन केंद्रांवर प्रत्येकी एक एकर क्षेत्रावर सूर्यफूल व मका पिकांची प्रात्यक्षिके घेण्यात येत आहेत. तेलबिया पिकांमध्ये सूर्यफूल हे अधिक तेलांश असलेले पीक असून पीक विविधीकरणाला चालना देण्यासाठी व शेतकऱ्यांना पर्यायी तेलबिया पीक उपलब्ध करून देण्यासाठी ही प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली आहेत.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील
आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )
वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४७०/२०२६ ने.ता.२८/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती सुशिला किसन नेहारे, वय अं.६७ वर्ष, धंदा- घरकाम, २) उमेश किसन नेहारे, वय अं.३६ वर्ष, धंदा- मजुरी क्र. १ व २ रा. झोलंबा, ता.वरुड, ३) सौ.नंदाबाई विश्वनाथ भारसाकरे, वय अं.४२ वर्ष, धंदा-घरकाम रा. उदापुर, ता.नरखेड, ४) सौ. उमा सुरेशराव चामलाटे, वय अं.४० वर्ष, धंदा- घरकाम, रा. तुमनी, ता.आष्टी, ५) सौ. कल्पना चंद्रकांत शेंद्रे, वय अं.३८ वर्ष, धंदा- घरकाम, रा.पिंपळा (पुनर्वसन), ता.आर्वी, ६) श्रीमती ललिता किशोर नेहारे, वय अं.४५ वर्ष, धंदा- घरकाम, ७) राखी किशोर नेहारे, वय अं.२० वर्ष, धंदा- शिक्षण क्र. ६ व ७ रा.झोलंबा, ता.वरुड, ८) सौ. मोहनी रोषण भारसकरे, वय अं.२२ वर्ष, धंदा- घरकाम, रा.उदापुर, ता.नरखेड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत किसना भगवान नेहारे, रा.झोलंबा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२८/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८अन्वये वरुड येथील
आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )
वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४५८/२०२६ ने.ता.२८/०७/२०२६**

**अर्जदार :-** गोकुलराव रामकृष्ण उर्फ रामकिसन डवरे, वय अं.६२ वर्ष, धंदा- शेती, रा.रोषणखेडा, ता.वरुड, जि.अमरावती,

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** १) सुभाष रामकृष्ण उर्फ रामकिसन डवरे, वय अं.६५ वर्ष, धंदा-शेती, रा.रोषणखेडा, ता.वरुड, २) श्रीमती पुष्पाताई उत्तमराव जानोसकर, वय अं.६० वर्ष, धंदा-गृहीणी, रा.लिहीदा, ता. मोर्शी,३) श्रीमती मिनाताई ज्ञानेश्वर बंड, वय अं.५० वर्ष, धंदा-गृहीणी, रा.जिजाऊ नगर,मोर्शी ता.मोर्शी

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रामकृष्ण उर्फ रामकिसन विठ्ठल डवरे व मयत विठाबाई रामकृष्ण उर्फ रामकिसन डवरे, रा.रोषनखेडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०१/१२/२०२५** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील
एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )
वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४७२/२०२६ ने.ता.०३/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) सतीश जनार्दन कुकडे, वय अं.४९ वर्ष, धंदा- नोकरी, रा.अमर कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती, २) जगदीश जनार्दन कुकडे, वय अं.४८ वर्ष, धंदा- शेती, रा.मोरचुंद, पो.पवनी ता.वरुड, ३) सौ. ज्योती धनराज नागले, वय अं.४५ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.प्लॉट नं ९, रुक्मिणी नगर, अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत जनार्दन पांडुरंगजी कुकडे व शकुंतला जनार्दन कुकडे, रा.मोरचुंद, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील
व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )
वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४७१/२०२६ ने.ता.२३/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती शांताबाई रमेश वाघाडे, वय अं.६१ वर्ष, धंदा-घरकाम, २) रविंद्र उर्फ रवि रमेश वाघाडे, वय अं.२९ वर्ष, धंदा- मजुरी ३) सुरज रमेश वाघाडे, वय अं.२६ वर्ष, धंदा-मजुरी, ४) राहुल रमेश वाघाडे, वय अं.२३ वर्ष, धंदा- मजुरी, रा. तुमनी, ता.आष्टी, ५) कु. स्नेहा उर्फ नेहा रमेश वाघाडे, वय अं.२१ वर्ष, धंदा- घरकाम, ६) आशिष रमेश वाघाडे, वय अं.२७ वर्ष, धंदा- मजुरी अर्जदार क्र. १ ते ६ रा. पुसला, ता.वरुड, ७) सौ. रितीका दुर्गादार चवारे, वय अं.३१ वर्ष, धंदा- घरकाम रा.पंधराखेडी, ता.वरुड, ८) सौ. अश्विनी विठ्ठल राऊत, वय अं.२५ वर्ष, धंदा- घरकाम, रा.पंचाळा, ता.आष्टी

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रमेश शामराव वाघाडे, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

स्व.नंदकिशोर पनपालिया यांच्या व्दितीय स्मृतिप्रित्यर्थ

# डॉ.विजय देशमुख सेवाव्रती पुरस्काराने सन्मानित



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहरातील प्रतिष्ठीत उद्योजक स्व.नंदकिशोर पनपालिया यांच्या व्दितीय स्मृतिप्रित्यर्थ स्व.विनायकराव गोधने आय.एम.ए.हॉल येथे सेवाव्रती पुरस्कार सोहळयाचे आयोजन करण्यात नुकतेच करण्यात आले होते. यावेळी शहरातील प्रसिध्द वैद्यकीय तज्ञ डॉ.विजय शरद देशमुख यांना त्यांच्या जलसंवर्धन, वैद्यकिय तसेच सामाजीक क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल त्यांना सेवाव्रती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या सोहळयाच्या अध्यक्षस्थानी पुसदचे उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल होते तर प्रमुख अतिथी म्हणुन प्रा.अनिल जावळे, माजी प्राचार्य एस.एन.बेलसरे, प्रसिध्द शल्यचिकित्सक डॉ.सुधाकर बंदे, प्रसिध्द हृदयरोग तज्ञ डॉ.राम गोधने, डॉ.के.एच.भुतडा, डॉ.विजय देशमुख यांच्या मातोश्री सरला देशमुख, अर्ध्यांगिनी डॉ.कविता देशमुख आदी मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.

स्व.नंदकिशोर पनपालिया यांनी धामणगांव रेल्वे हून वरुन वरुडला येवून व्यवसायासह सामाजिक व धार्मिक कार्य त्यांनी समाजोपयोगी केलेत. सेवाभाव कायम ठेवून ते आयुष्य जगले, त्यांचा हा वसा पुढील पिढीला मिळावा व समाज सेवेचे हे व्रत अखंड चालू रहावे या उद्देशाने दरवर्षी प्रमाणे त्यांच्या स्मृतित स्व.नंदकिशोर पनपालिया स्मृति प्रित्यर्थ 'सेवाव्रती पुरस्कार' यंदा शहरातील प्रसिध्द वैद्यकीय तज्ञ डॉ.विजय शरद देशमुख यांना त्यांच्या जलसंवर्धन, वैद्यकिय तसेच सामाजीक क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल प्रदान करण्यात आले. रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप होते. डॉ.विजय देशमुख व डॉ.कविता देशमुख यांना उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन चंद्रकांत चांगदे, प्रास्तविक व आभार प्रविण लढढा यांनी मानले. या वरुडडशहरातील डॉक्टर्स, नंदकिशोर पनपालिया मित्र मंडळ व वरुड शहरातील अनेक मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.




# मोहरम आणि सण, उत्सवाचे औचित्य साधुन पोलिस स्टेशनच्या वतीने मुख्य मार्गाने पोलिसांचे पथसंचलन



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – मोहरम आणि सण, उत्सवाचे औचित्य साधुन वरुड पोलिस स्टेशनच्या वतीने शहराच्या मुख्य मार्गाने पोलिसांचे पथसंचलन करण्यात आले.

आगामी मोहरम सण शांततापूर्ण व सुरक्षित वातावरणात पार पडावा यासाठी वरुड पोलिसांनी शहरातील प्रमुख मार्गांवर पथसंचलन केले. या पथसंचलनाद्वारे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यात आली तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस प्रशासन सज्ज असल्याचा संदेश देण्यात आला.

मोर्शीचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार अर्जुन ठोसरे यांचे उपस्थितीत मोहरम उत्सव निमित्त वरुड शहरात दंगा काबु योजना रंगीत तालीम राबविण्यात आली. शहरातील संवेदनशील भागात फिक्स पॉईंट तसेच संवेदनशील मिश्र वस्तीतुन पोलिसांचे पथसंचलन घेण्यात आला. सदर दंगा काबु तालीम प्रसंगी पोलिस स्टेशन वरुड येथील ४ अधिकारी, १९ अमंलदार, २५ सैनिक पोलिस स्टेशन, बेनोडा येथील २ अधिकारी, २ अंमलदार, ३ सैनिक, पो.स्टे शें.घाट १ अधिकारी, ३ अंमलदार, २ सैनिक पो. स्टे.मोर्शी येथील १ अधिकारी व ५ अंमलदार सहभागी झाले होते.

यावेळी नागरिकांना शांतता, सामाजिक सलोखा आणि परस्पर सहकार्य राखण्याचे आवाहन करण्यात आले. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता संशयास्पद हालचाली किंवा घटना त्वरित पोलिसांना कळवाव्यात, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले. मोहरमच्या पार्श्वभूमीवर पोलिस विभागाकडून सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला असून, सणादरम्यान शहरात चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. नागरिकांनीही पोलिसांच्या या उपक्रमाचे स्वागत करत सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली.

# वादातून मारहाण : पती-पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल

**सातनूरमध्ये गाय शेतात गेल्याचे प्रकरण**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – शेतात गाय गेल्याच्या कारणावरुन झालेल्या वादाचे पर्यवसान मारहाणीत झाल्याची घटना तालुक्यातील सातनूर येथे घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी पती–पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी विष्णू अण्णाजी ढोके (५९) हे २२ जून २०२६ रोजी दुपारी ५ वाजताच्या सुमारास असताना हा वाद झाला. आरोपी किशोर तुकाराम बागडे (५०) हातात लाकडी काठी घेऊन त्याची पत्नी रेखा किशोर बागडे (४०) हिच्यासह फिर्यादीकडे आला. 'तुझ्या गाईने माझ्या शेतातील मक्का खाल्ला, तू तुझी गाय का बांधून ठेवत नाही?' अशी विचारणा त्याने केली. यावर फिर्यादीने 'मी माझी गाय बांधून ठेवली होती, ती सुटली असेल म्हणुन तुमच्या शेतात आली' असे सांगितले. याचा राग येऊन आरोपी फिर्यादीला शिवीगाळ करु लागला. फिर्यादीने शिवीगाळ करण्यास विरोध केला असता, आरोपीने हातातील लाकडी काठीने फिर्यादीच्या डोक्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीने काठी अडवण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्या डाव्या हाताच्या पोटरीवर काठी लागल्याने हात सुजला व दुखापत झाली. तसेच आरोपी क्रमांक १ व २ या दोघांनी फिर्यादीला शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर विष्णु ढोके यांच्या जबानी रिपोर्ट आणि वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे वरुड पोलिसांनी आरोपी किशोर बागडे आणि रेखा बागडे यांच्याविरुद्ध कलम ११८ (१), ३५१(२), ३५२ अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

# राष्ट्रपती भवनात महाराष्ट्रातील सात मान्यवरांना 'पद्म' पुरस्कार प्रदान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**नवी दिल्ली** – देशातील महत्वाचे नागरी सन्मान असलेल्या 'पद्म पुरस्कारांचे' वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सन्मानपूर्वक करण्यात आले. महाराष्ट्रातील सात मान्यवरांना त्यांच्या विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले.

राष्ट्रपती भवनातील 'गणतंत्र मंडप' येथे आयोजित या समारंभास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यासह अन्य केंद्रीय मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते.

पद्म पुरस्कार वितरणाच्या दुसऱ्या टप्प्यात देशभरातील ६५ मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये २ पद्मविभूषण, ७ पद्मभूषण आणि ५६ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील मान्यवरांपैकी प्रसिद्ध पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. १६ हून अधिक भाषांमध्ये २ हजारांपेक्षा अधिक गीते गाऊन त्यांनी भारतीय संगीत क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.

**सहा मान्यवरांना पद्मश्री पुरस्कार**

क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार रोहित शर्मा, वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. आर्मिडा फर्नांडिस, वारली आदिवासी परंपरेचे जतन करणारे ८९ वर्षीय तारपावादक भिकल्या लाडक्या धिंडा यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला, अभिनेते, पटकथा लेखक, निर्माते आणि दिग्दर्शक आर. माधवन यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, ज्येष्ठ अभिनेते सतीश शाह यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल मरणोत्तर पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला, उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल अशोक खाडे यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले.

यंदाच्या पद्म पुरस्कारांसाठी एकूण १३१ पुरस्कारांची घोषणा करण्यात आली होती. त्यामध्ये ५ पद्मविभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. पुरस्कारार्थींमध्ये १९ महिलांचा समावेश असून १६ मान्यवरांना मरणोत्तर सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

